: रक्तदान पोवाडा :

(लेखक : विज्ञानशाहीर प्रभाकर, मुंबई)

चला चला पुण्य पाहू पदरात। पदरात। चला करू रक्तदान, महादान ॥ध्रु॥

वेदकाळी देती दान। दानांची होती शान। दात्यांचा गौरव लोकात ॥१॥

कलियुगामधी दान। धर्माचे हे लक्षण। गृहस्थाश्रमाची ही खूण ॥२॥

नाना वस्तू देती दान। गाय, घोडा, उंट छान। भूमिदान सरस दानात ॥३॥

कलियुगी रक्तदान। दानात महादान। रक्त देई समद्यास जीवदान ॥४॥

रक्त खेळे शरिरात। पंचप्राण पुरवित। रक्तरूपी आत्मा देहात ॥५॥

रक्त जेव्हा कमी होत। जीव कासाविस होत। पंचप्राण कंठाशी येतात ॥६॥

प्राणज्योत तेवण्यास। रक्ताची तेलवात। रक्ताविण प्राणज्योत मालवत ॥७॥

कधी होती अपघात। रक्ताच्या धारोळ्यात। रक्ताविण दम सारे सोडतात ॥८॥

ऑपरेशन मोठी मोठी। रक्ताविण होते खोटी। बाटल्या बाटल्या रक्ताच्या लागतात ॥

रक्ताचा कारखाना। जगी नाही कुठे जाणा। रक्त फक्त तयार देहात ॥१०॥

रक्ता नाही जातपात। लाल रंग एकजात। भेदभाव ठाव नाही रक्तास ॥११॥

दानासाठी काळवेळ। रक्तपेढी हेच स्थळ। मुहूर्त याला ना लागत ॥१२॥

प्रभाकर विनवित। पुण्य जोडा हमखास। रक्तदाना तोड नाही जगतात ॥१३॥

———

५७४ ६/२/१९९९